MAHARASHTRA EDUCATION SOCIETY'S
(SINCE 1860)

MES SENIOR COLLEGE, PUNE

131, Mayur Colony, Ch. Rajaram Maharaj Path, Kothrud, Pune - 411038, Maharashtra, India I Ph.: 020-25463453 / 25440196
E-mail : info.bba@mespune.in I Web : https:// bba.mespune.in

Approved by AICTE, New Delhi & Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune

BBA/ BBA-IB/ BBA-CA

First Year Fee Structure
Academic Year 2026 – 27

Sr. No.	Description	Fees	Total Fees
1.	Tuition Fee	55454.00	55454.00
2.	Development Fee	6046.00	6046.00
3.	Management Seat Fees		
4.	NRI Seat Fees	-	-
5.	Against NRI Seat Fees	-	-
6.	Caution Money/ Deposit	-	-

- **Note: The above fees have been approved by the Fees Regulating Authority (FRA) in its Minutes of Meeting dated 27/10/2026.**

- **College Fees Details:**
  Account Name : MES SENIOR COLLEGE
  Bank Account No. : 238801002783 **Bank Name : ICICI BANK LTD**
  Branch : KOTHRUD **IFSC : ICIC0002388 .**
  Payment Mode/s : NEFT / RTGS / UPI / NET BANKING/ Demand Draft.

बी.बी.ए, /बीबीए-आय.बी., /बीबीए-सीए

प्रथम वर्ष प्रवेश शुल्क
शैक्षणिक वर्ष २०२६ – २७

अ . क्र.	तपशील	शुल्क	एकुण शुल्क
१.	शिक्षण शुल्क	५५४५४.००	५५४५४.००
२.	विकास शुल्क	६०४६.००	६०४६.००
३.	व्यवस्थापन आसन शुल्क	-	-
४.	एनआरआय आसन शुल्क	-	-
५.	अगेन्स्ट एनआरआय आसन शुल्क	-	-
६.	कॉशन मनी / डिपॉझीट	-	-

- **सुचना: वरील शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) २७ /१०/२०२६ च्या बैठकीच्या इतिवृत्तात मान्यता दिली आहे.**
- **महाविद्यालय शुल्क तपशील :**

खात्याचे नाव: एम.ई.एस सीनियर कॉलेज
बँक खाते क्रमांक: २३८८०१००२७८३ **बँकेचे नाव: आयसीआयसीआय बँक लि.**
शाखा: कोथरूड **आयएफएससी: आय सी आय सी ०००२३८८**
पेमेंट पद्धती: एनईएफटी / आरटीजीएस / यूपीआय / नेट बँकिंग / डिमांड ड्राफ्ट.

MES Senior College Pune

डॉ. रविंद्र वैद्य
प्राचार्य

तसेच, सॉफ्टवेअर लायसन्स रिन्यूअलच्या (Software License Renewal) खर्चापैकी काही भाग अमान्य करण्यात आला होता; तथापि, सदर खर्च हा चालू वर्षात होणारा आवश्यक खर्च असल्याने मान्य करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे सुधारणा करून हा संपूर्ण खर्च ग्राह्य धरण्यात आला आहे. सदर रक्कम रुपये ४२,१८५/- इतकी होती, ती पूर्णांकात (Rounded off) करून रुपये ४२,०००/- मात्र मान्य करण्यात आली आहे आणि त्यानुसार हा पुनर्विलोकन अर्ज (Review Application) मंजूर करून शुल्क सुधारित (Revised) करण्यात येत आहे.

बी.एम.एस. (BMS) अभ्यासक्रमासाठी नमुना A1 आणि A2 (Form A1 & A2) मध्ये भरलेली माहिती तांत्रिकदृष्ट्या चुकीची आहे. त्यामध्ये नमूद केलेला रु. ११,६७,८७८/- इतका खर्च प्राधिकरणाने अमान्य केला आहे.

सदर अमान्य खर्चाबाबत 'नॉन-एफआरए' (Non-FRA) खर्चाव्यतिरिक्त कोणताही समाधानकारक खुलासा किंवा स्पष्टीकरण संस्थेतर्फे सादर करण्यात आले नाही. तसेच या दाव्याच्या पुष्ट्यर्थ संस्था कोणतेही सबळ कागदपत्र किंवा आर्थिक पुरावे सादर करू शकली नाही. अशा परिस्थितीत, संस्थेने केलेला शुल्क वाढीचा दावा आधारहीन आणि चुकीचा ठरत असल्याने हा मुद्दा मान्य करता आला नाही. परिणामी, संस्थेने सादर केलेला सदर पुनर्विलोकन अर्ज (Review Application) प्राधिकरणाकडून फेटाळण्यात (Rejected) येत आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता, संस्थेचा पुनर्विलोकन शुल्काची रक्कम **खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे**.

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027
१५२/२०२६	बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय, पुणे Code: BBA16159	B.B.A	42,000/- Per student
		B.M.S	Rejected

viii) एमईएस सीनियर कॉलेज, कोथरूड, पुणे (BBA16202) यांनी B.B.A अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. १५४/२०२६.**

"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. डॉ. रवींद्र वैद्य, संस्थेचे प्राचार्य
२. श्री. निखिल पाटणकर, संस्थेचे सनदी लेखापाल
३. श्री. अमित व्ही., संस्थेचे लेखापाल

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

संस्थेमार्फत अशी विनंती करण्यात आली होती की, संस्थेची एकूण विद्यार्थी प्रवेशक्षमता ८०० दर्शवण्यात आली होती; मात्र बीबीए (BBA) या अभ्यासक्रमात प्रत्यक्ष प्रवेश संख्या ८० ने कमी झाल्यामुळे, एकूण विद्यार्थी प्रवेशक्षमता ७२० इतकी करण्यात यावी. संस्थेची ही विनंती मान्य करण्यात आली आहे."

शिक्षण कर्मचाऱ्यांमधील (Teaching Staff) रु. ४९,२७,८४७/- व गैर-शिक्षण कर्मचाऱ्यांमधील (Non-Teaching Staff) रु. १७,७३,१००/- इतकी रक्कम अमान्य करण्यात आली होती. सदर रक्कम अमान्य करताना, हे कर्मचारी एकाच संस्थेच्या एकापेक्षा जास्त महाविद्यालयात/अभ्यासक्रमात कार्यरत असल्याचे कारण दर्शविण्यात आले होते.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

या संदर्भात संस्थेतर्फे असा खुलासा सादर करण्यात आला की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पूर्वी संबंधित कर्मचारी इतर महाविद्यालयात कार्यरत होते. तथापि, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून त्यांची बदली 'एमईएस सीनियर कॉलेज, कोथरूड, पुणे' (MES Senior College, Kothrud, Pune) या महाविद्यालयात 'बीबीए' (BBA) अभ्यासक्रमासाठी करण्यात आली होती. त्यामुळे हे कर्मचारी एकाच वेळी दोन वेगवेगळ्या अभ्यासक्रमांसाठी/महाविद्यालयांसाठी कार्यरत नव्हते.

या दाव्याच्या पुष्ट्यर्थ संस्थेने शुल्क मान्यतेसाठी आवश्यक असणारे प्रवेश पुरावे/उपस्थिती पत्रक (Transfer order) आणि संबंधित कर्मचाऱ्यांचे 'फॉर्म नं. १६' (Form No. 16) सादर केले. सादर केलेल्या या पुराव्यांच्या आधारे संस्थेची विनंती मान्य करण्यात आली असून, शुल्काची पुनर्गणना (Recalculation) करून संस्थेचा पुनर्विलोकन अर्ज मंजूर करून शुल्काची रक्कम **खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे**.

Review Application No.	Name of the Institute	Course	After hearing, Fees Revised for the A.Y. 2026-2027
१५४/२०२६	एमईएस सीनियर कॉलेज, कोथरूड, पुणे. **Code No : BBA16202**	**BBA**	**61,500/- Per student**

ix) SIES कॉलेज ऑफ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय (एम्पॉवर्ड ऑटोनॉमस) मुंबई (BMS03574) यांनी B.M.S अभ्यासक्रमासाठी दाखल केलेला **पुनर्विलोकन अर्ज क्र. २३१/२०२६.**

"खालील व्यक्ती संस्थेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उपस्थित होत्या.

१. डॉ. राधिका बिरमोळे, संस्थेच्या प्राचार्य

२. श्री. गौतम शेठ, संस्थेचे लेखापाल

३. श्रीमती सुश्मिता साहू, संस्थेच्या मुख्य संचालक

सर्वांचे म्हणणे ऐकून घेतले.

अध्यक्ष
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

संस्थेच्या वतीने युक्तिवाद करण्यात आला की, प्राधिकरणाने रु २,५७,८३३ /- खर्च अमान्य केला आहे .तथापि सदर खर्च प्रत्यक्षात झालेला असल्याने तो विचारात घेऊन मान्य करण्यात यावा, अशी विनंती करण्यात आली.

तसेच, सुनावणीदरम्यान संस्थेच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, सदर खर्च संस्थेच्या वतीने इतर बाबींवर करण्यात आलेला आहे. तथापि, प्राधिकरणाने सादर केलेली कागदपत्रे व उपलब्ध अभिलेखांची तपासणी केली असता, सदर खर्च संस्थेच्या खात्यात ग्राह्य धरण्यास पुरेशी आधारभूत कागदपत्रे व समाधानकारक स्पष्टीकरण उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे प्राधिकरणाने केलेली शुल्काची गणना योग्य असल्याचे आढळून आल्याने संस्थेचा **पुनर्विलोकन अर्ज नामंजूर (Rejected) करण्यात आला**".